# गाभा

प्राणीमात्री वस्तूमात्री पाही मजसीच
शरण ये मला तुझी काळजी वाहीन
मात्र जसे करशील तसे भोगशील
सांगे भगवंत असे भगवद्गीतेत ||१||

म्हणून शिकविती आपुले आईबाप
वागावे चांगले करू नये भेदभाव
प्रतिबिंब दिसे याचे संत चरित्रात
नामदेव तुकोबा वा असो एकनाथ ||२||

तूप घेऊनी धावे श्वानामागे नामोबा
वाटी ऊस गावभर साऱ्या पोरां तुकोबा
पाजी एकनाथ पाणी तहानेल्या गर्दभा
ज्ञान तत्त्व धर्म या साऱ्यांचा हाच गाभा ||३||

– नारायण
०८/१६/२३